




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे अंक : ७८६. वा बुधवार दि. २९ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# वीजतंत्री अंभोरेंच्या कृष्णकृत्यांकडे अधिकारी लक्ष देणार की नाही?

## जिल्हा शल्यचिकित्सकांची अंभोरेंप्रति एव्हढी लाचारी कशासाठी?

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयातील वीजतंत्री एस. एल.अंभोरे ह्यांची शैक्षणिक पात्रता नसतांना गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय विभागाचा कारभार हाती घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी वाट्टेल त्या तिकडमबाज्या करणे, आपल्याच सहकाऱ्यांचा मानसिक छळ करणे, आपल्या सहकाऱ्यांबाबत वरिष्ठांकडे खोट्या तक्रारी करणे किंवा प्रसंगी पोलिस कारवाईच्या धमक्या देणे, अशी कृष्णकृत्ये करीत आहेत. शोकांतिका ही आहे की, अंभोरे यांच्या कृष्णकृत्यांकडे जिल्हा शल्यचिकित्सक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. यासंदर्भात तक्रारकर्ते तत्कालीन वैद्यकीय अधिकारी वाघ यांनी वारंवार जिल्हा शल्यचिकित्सकांकडे यासंदर्भात माहिती यापूर्वी वारंवार दिलेली आहे. तरीही जिल्हा शल्यचिकित्सक अंभोरे यांच्या या नियमबाह्य कामकाजाकडे दुर्लक्ष का करतात, हे अजूनही न उलगडलेले कोडे आहे. जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी पद-ाचा कार्यभार सांभाळण्यासाठी वैद्यकीय क्षेत्राची शैक्षणिक पात्रता लागते. त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही शैक्षणिक पात्रतेचा व्यक्ती वैद्यकीय अधिकारी म्हणून कामच करू शकत नाही. असे असतानाही वीजतंत्री म्हणून काम करणाऱ्या एस. एल. अंभोरे यांच्याकडे वैद्यकीय विभागाचा कार्यभार काही महिन्यांपूर्वी अनधिकृतरित्या देण्यात आला होता. परंतु यावरून हलकल्लोळ उडाल्यानंतर मग अंभोरे यांच्याकडून हा पदभार काढून घेण्यात आला. परंतु भ्रष्टाचाराला चटावलेले अंभोरे या पदासाठी सातत्याने आटापीटा करीत राहिले. दरम्यान, वैद्यकीय अधिकारी पदावर जो कोणी अधिकारी येतो, त्याला सातत्याने त्रास देण्याचे

**पोस्टमार्टम १३**

काम अंभोरे हे करीतच राहिले. यापूर्वी धाड रोडवर एका वैद्यकीय अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झालेला असून, इतर अधिकाऱ्यांनाही नाना प्रकारे त्रास देण्यात आलेला आहे. यापूर्वीचे आरोग्य अधिकारी वाघ यांनाही अंभोरे यांनी प्रचंड त्रास दिला. वाघ यांनी काही दिवस हा त्रास सहन केला, परंतु अंभोरे व त्यांच्या चेल्याचपाट्यांनी वाघ यांना एव्हढा त्रास दिला की, वाघ यांच्याकडून तो सहन करेनासा झाला. त्यानंतर वाघ यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे आपल्याला होणाऱ्या त्रासाची माहिती दिली. परंतु वाघ यांना जिल्हा शल्यचिकित्सकांकडून कोणताही दिलासा मिळाला तर नाहीच, परंतु अप्रत्यक्षरित्या अंभोरे हे आरोग्य अधिकाऱ्याच्या कामकाजात जो हस्तक्षेप करीत असतानाही, त्याकडेही दुर्लक्ष केले. हे पाहून तर मग अंभोरे चांगलेच चेकाळले व त्यांनी सातत्याने वाघ यांच्या कामकाजात हस्तक्षेप करून त्यांना प्रचंड मानसिक त्रास दिला. अनधिकृत पद्धतीने बिले आणून ती वरिष्ठांच्या सहमतीने मंजूर करून घेण्याचे काम अवैधरित्या अंभोरे सध्याही करीत आहेत. परस्पर पावत्या फाडून घेतल्या जात आ-हेत. अशाप्रकारे हा भ्रष्टाचार अंभोरे करीत आहेत. भ्रष्टाचार करण्यात अंभोरे इतके माहीर झाले की ते त्यांच्या रजेच्या काळात देखील जिल्हा रुग्णालयात येऊन बळजबरीने बिले मंजूर करून घेऊन जात होते. यासंदर्भात आरोग्य अधिकारी वाघ यांचा दिलेल्या तक्रारीत आरोप आहे की, अंभोरे हे इतर अधिकारी

**जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचे झालेले विविध विभागातील भ्रष्टाचार व त्यातून जमवलेली संपत्ती /अपसंपदा दोषींवर कडक कारवाई व भ्रष्टचारातील करोडो रुपये शासन तिजोरीत व्याजासह जमा होत नाही हा पाठपुरावा असाच सुरू राहणार**





व कर्मचाऱ्यांच्या सहमतीने अनेक गैरप्रकार करीत आहेत, तर दुसरीकडे ते वाघ यांच्यावरच विविध प्रकारचे आरोप करून त्यांना खोट्या केसेसमध्ये फसवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अंभोरे यांनी आपल्या काही चेलाचपाट्यांना हाताशी धरून वाघ यांच्यावरच पोलिस तक्रार देऊन अप नं ४३२/२०२४ कलम ४१६,४२०,४६४,४६७,४६८,४७१ भादवी नुसार फसवणुकीचे गुन्हे दाखल केले असल्याची चर्चा जिल्हा रुग्णालय परिसरात जोरदारपणे होत आहे. एकीकडे हे सर्व काही होत असताना तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस हे जाणीपूर्वक दुर्लक्ष करीत राहिले आणि हा भ्रष्टाचार होऊ दिला. जिल्हा रुग्णालयात जे विविध पातळ्यांवर भ्रष्टाचार बोकाळलेले आहेत, त्यात अंभोरे यांचा भ्रष्टाचार देखील प्रमुख आहे. अंभोरे यांच्याकडे विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सक सुभाष चव्हाण यांनी परत एकदा वैद्यकीय अधिकाऱ्याचा पदभार सोपवला. अंभोरे यांच्याकडे या पदासाठी पात्रता नसताना देखील चव्हाण यांनी कोणत्या नियमांच्या आधारे हा पदभार दिला, हे अद्यापही कुणाला कळलेले नाही. खरे तर चव्हाण यांना अशाप्रकारे बेकायदेशीरपणे पदभार देण्याचा अधिकार आहे का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. अंभोरे हे वैद्यकीय अधिकारी म्हणून अत्यंत मुजोरपणे आणि मस्तवाल-पणे सध्या कामकाज करीत आहेत. भ्रष्टाचारासाठी अंभोरे आता इतके चटावले आहेत की, ते आपल्याच विभागातील एका दुसऱ्या अधिकाऱ्याचा नाहक छळ करीत आहेत. विशेष हे की, याकडे जिल्हा शल्यचिकित्सक ढिम्मपणे पाहत आहेत. या स्थितीत आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून यासंदर्भात तात्काळ अंभोरे यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. जोपर्यंत अंभोरे यांच्यासारखी शकोनी भ्रष्टाचारी डोकी संपवली जात नाहीत आणि त्यांना कायदेशीररित्या शिक्षा होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सत्याच्या बाजूने आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात खंबीरपणे संघर्ष करीत राहील व जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचारावर सातत्याने आसूड ओढतच राहील.

अजून बरेच काही पुढील भागात

## धारदार शस्त्राने वार करीत युवकाची केली हत्या

**जनसंचलन/ मेहकर**

शहरात २२ वर्षीय युवकावर धारद-ार शस्त्राने वार करीत त्याची हत्या केल्याची घटना २७ मे रोजी रात्री घडली. या प्रकरणी मेहकर आकाश नन्नवरे मृतक पोलिसांनी संशयित आर-ोपी चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. आकाश राजू नन्नवरे रा. माळीपेठ मेहकर असे मृतक युवकाचे नाव आहे. शहरातील माळीपेठ येथील राजू नामदेव नन्नवरे या युवकाची जानेफळ रस्त्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. या प्रकरणी राजू नामदेव नन्नवरे यांनी दिलेल्या फिर्यादीत गणेश किशोर थाबडे रा. माळीपेठ याने आकाश नन्नवरे यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले आहे. त्यावरून मेहकर पोलिसांनी गणेश थाबडे याच्यासह दोन ते तीन जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. मेहकर शहरात युवकाच्या हत्येमुळे खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती




मिळताच, सिंदखेडराजाच्या उपविभागीय पोलिस अधिकारी कदम आणि मेहकरचे ठाणेदार राजेश शिंगटे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली.

## गळफास घेवून युवकाची आत्महत्या

**जनसचंलन/चिखली**

शेलूद येथील ३० वर्षीय युवकाने वडाच्या झाडाला रूमालाच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना २६ मे रोजी रात्री ९.३० वाजेदरम्यान उघडकीस आली आहे. येथील कौसर अफसर पठाण या युवकाने गावातील ग्रामपंचायत भवन परिसरातील वडाच्या झाडाला रूमालाने गळफास



घेवून जीवनयात्रा संपविली. त्याच्या पश्चात आई-वडील, २ भाऊ, मुलगा, मुलगी व बराच मोठा परिवार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबईवरुन अपहरण झालेल्या बालकाची शेगाव येथे सुटका...



**जनसंचलन/ शेगाव**

पायधुनी पोलीस स्टेशनच्या हद्दीतून अपहरण झालेल्या १३ वर्षीय मुलाची शेगाव येथे ट्रेन मधून सुटका करण्यात आली आहे. २६ मे रोजी मोहम्मद आसिफ या बालकाचे अपहरण झाले होते त्यानुसार कलम ३६३ नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुंबई पोलिसांना हा बालक ट्रेन नं १२८६९ मध्ये असल्याचं समजल्यावर त्यांनी समजलं तसेच त्यांनी सीसीटीव्ही बघण्यासाठी गेले असता आरपीएफच्या महिला प्रधान आरक्षक सविता इंगवले भेटल्या त्यांनी त्यांच्याच बैचमेट्स असलेल्या शेगाव येथील आरपीएफ रंजन तेलंग यांचा नंबर मुंबई पोलिसांना दिला आणि सम्पर्क होताच रंजन तेलंग यांनी गुप्तहेर पाठवून अपहरण झालेलं बालक एस ७ कोच मध्ये बसलेला असल्याचं माहीत करून शेगावला ट्रेन येताच त्याला रेस्क्यू केलं व त्याची सूचना मुंबई पोलिसांना दिली, त्यावरून २७ मे रोजी त्या बालकाला विधिवत कार्यवाही पूर्ण करून मुंबई पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेचा छडा लावणारे आरपीएफचे रंजन तेलंग यांनी सहा महिन्यांपूर्वी एक सहा वर्षीय चिमुकलीला अपहरणकर्त्यांच्या तावडीतून वाचवले होते

# गजानन पेट्रोलपंपाची कॅश लुटणारे चोरट्यांना ठोकल्या बेड्या...

## ९६ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मुंबई नागपूर महामार्गावरील नसराबाद येथील गजानन पेट्रोल पंपावरून कॅश घेऊन शहराकडे येत असताना चोरट्यांनी १ लाख ९६ हजाराची रोख रक्कम ३ मे रोजी लुटली होती पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे कसून तपास करून २७ मे रोजी ९६ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल सह तीन चोरट्यांना जेरबंद केले आहेत. सविस्तर हकीकत अशी की, ४ मे रोजी फिर्यादी विष्णु को, ४ मे रोजी कियादी विष्णु व्यवसाय गजानन कॉर्पोरेशन माळसावरगांव पेट्रोल पंपावर मैनेजर, रा. तुळजापुर यानी रिपोर्ट दिला की, नमुद फिर्यादी हे नमुद पेट्रोलपंपावर मैनेजर या असून दिवस काम करीत अलग रक्कम सायंकाळी पेट्रोल पंप मालक किरण तायडे यांचे कडे सिंदखेड राजा येथे जमा करण्यास येत असतात दिनांक ०३/०५/२०२४ चे रात्री २०/०० वा. सुमारास मॅनेजर पंपावर जमा झालेली रक्कम नगदी १,९६,१३० रुपये अक्षरी (एक लाख शहान्नव हजार एकशे तीस रुपये) घेवून मोटार सायकल ने येत असतांना पाठीमागुन दोन इसमाने मो सा वर येवुन मॅनेजर यांना मारहाण करून मॅनेजर जवळील नगदी १,९६,१३० रुपये जबरदस्तीने हिसकावुन घेवून पळुन गेले अशा आशयाचे रिपोर्ट वरून नमुद गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हयाचे तपासामध्ये वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सिंदखेड राजा व स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यानी संमातर तपास करून आरोपी बाबत कोणताही सुगावा नसतांना तांत्रीक तपासाद्वारे व गोपनीय बातमीद्वारे आशिष भास्कर मोरे रा नसिराबाद यास अटक करून पुढील तपास केला असता नमुद गुन्हयात आरोपी, तातेराव छगन जाधव वय ३३ वर्षरा. नसिराबाद ता. सिंदखेड राजा जि. बुलडाणा, महेश ऊर्फ बाली ज्ञानेश्वर सोनुने वय २४ वर्ष रा. छोटा बौध्दवाडा सिंदखेड राजा जि. बुलडाणा यांचा सहभाग असल्यानेत्यांना वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक करून आरोपीतांचा २७ मे रोजी पावेतो पिसरीआर घेवून तपास केला असता गुन्हयातील आरोपी, आशिष भास्कर मोरे वय १९ वर्ष रा. नसिराबाद ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा, तातेराव छगन जाधव वय ३३ वर्षरा. नसिराबादता. सिंदखेड राजा जि. बुलडाणा, महेश उर्फ वय २४ वर्ष रा. छोटा बौध्दवाडा सिंदखेड राजा जि. बुलडाणा गुन्हयातील चोरलेले नगदी पैसे, गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली मोटार सायकल, गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेले दोन मोबाइल, गुन्हयात वापरलेली काठी तसेच पंपावरील असा एकुन नगदी व मुददेमाल ९६,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक सुनिल कडासणे, अपर पोलीस अधिक्षक बी. बी. महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती मनिषा कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सिंदखेड राजा व स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यांनी केली असुन पुढील तपास पोलीस स्टेशन सिंदखेड राजा करत आहे



# फांदी डोक्यावर पडल्याने वृद्धाचा मृत्यू


**जनसंचलन/मलकापूर**

तालुक्यात विजेच्या कडकडाटात वादळवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. वादळामुळे झाडांची फांदी डोक्यावर पडल्याने गंभीर जखमी झालेल्या ६४ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना मलकापूर तालुक्यातील बेलाड येथे रविवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. मलकापूर तालुक्यात रविवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटात वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा बसला. बेलाड येथेही वादळामुळे झाडे उन्मळून पडली, तर फांद्या तुटून पडल्या, येथील निवृत्ती घंसाराम इंगळे (वय ६४) राहत्या घरी साहित्याची सावरासावर करीत असताना जोरात वारा सुटला. त्यामुळे त्यांच्या घरालगतच्या झाडाची फांदी निवृत्ती घंसाराम इंगळे यांच्या डोक्यावर पडली. त्यामुळे गंभीर जखमी झाले अन् खाली कोसळले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी मलकापूर येथे नेण्यात आले. डोक्यावर गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच दुसऱ्या घटनेत शहरातील पुरातन शिवमंदिराचा खांब कोसळला. या अपघातात ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. तालुक्यात रविवारी वादळवाऱ्यासह झालेल्या पावसाने थैमान घातले.

# बाशवीची सप्लिमेंटरीची परीक्षा होणार १६ जुलैपासून

**जनसंचलन/बुलढाणा**


राज्य मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थी आणि श्रेणी सुधार करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै ऑगस्टमध्ये पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीचा प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह २७ मे ते ७ जून आणि विलंब शुल्कासह ८ ते १२ जून यादरम्यान भरता येणार असल्याचे विभागीय शिक्षण मंडळाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यातील ३ हजार २९८ विद्यार्थी नापास झाले आहेत. या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार आहे. राज्य मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थी आणि श्रेणी सुधार करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै ऑगस्टमध्ये पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीचा प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह २७ मे ते ७ जून आणि विलंब शुल्कासह ८ ते १२ जून यादरम्यान भरता येणार असल्याचे शिक्षण मंडळाकडून सांगण्यात आले. बारावी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि सर्व विषय घेऊन बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेंतर्गत जुलै, ऑगस्ट २०२४ आणि फेब्रुवारी - मार्च २०२५ या लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील. पुरवणी परीक्षा जुलै ऑगस्टमध्ये घेतली जाणार आहे. त्यासाठी राज्य मंडळाने परीक्षेसंदर्भातील परिपत्रक शुक्रवारी जाहीर केले आहे. राज्य मंडळाच्या परिपत्रकानुसार, विद्यार्थ्यांचे अर्ज दिलेल्या मुदतीत १५ महाविद्यालयांनी जूनपर्यंत चलनाद्वारे शुल्क बँकेत भरायचे आहे. तसेच १८ जूनला महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करायच्या आहेत. अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये आता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# १० वी उत्तीर्ण विद्यार्थी गोकुळची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/ संग्रामपूर**

दहावीचा निकाल लागल्या नंतर ६५ टक्के मार्क्स मिळवलेल्या वरवट खंडेराव येथील गोकुळ प्रकाश ढेंगे या विदयार्थ्याने घरातच दोराने गळफास घेऊन जीवन यात्रा संपविल्या ची घटना सोमवारी दुपारी ३ वाजता उघडकीस आली. मृतक गोकुळ याने शेगाव येथील शाळेत शिकुन दहावीची परीक्षा दिली होती. आज परीक्षेचा निकाल लागला ६५ टक्के मार्क्स मिळाल्याचे त्याला समजले. यानंतर त्याने घराच्या वरच्या माळ्यावर जाऊन गळफास घेतला ही बाब दुपारी ३ वाजता उघडकीस आली. रात्री १० वाजता मृतक गोकुळ वर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतक गोकुळला आई वडील ४ बहिणी असुन त्याच्या मृत्युने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# अखेर महीला सरपंचाचे आत्मदहन आंदोलन स्थगित...

## महसूल विभाग एक जूनपर्यंत रेती घाटाची तांत्रीक मोजनी करण्याच्या लेखी आश्वासनाने अखेर महीला सरपंचाचे आत्मदहन आंदोलन स्थगित

जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील शासकीय रेती घाटातून लाखो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन झाले असून सदर घाटाची तांत्रिक मोजमाप करून सीसीटीव्ही फुटेज मिळत नसल्याने अखेर महीला सरपंच यांनी निमगाव वायाळ रेती घाटात २७ मे रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता सदर आत्मदहन आंदोलन रद्द करण्यासाठी महसूल व पोलिस प्रशासनाला यश मिळाले असून सिंदखेडराजा तहसिलदार प्रविण धानोरकर यांच्या आदेशाने सरपंच सौ शिलाबाई रामेश्वर चाटे यांना लेखी पत्राद्वारे सदर रेती घाटाचे १ जूनपर्यंत मोजमाप करण्याचे पत्र नायब तहसीलदार संदीप बंगाळे




मंडळ अधिकारी मस्के तलाठी यशवंत घरजाळे, विष्णू थोरात, राहुल देशमुख,आकाश मघाडे कोतवाल यांच्या उपस्थितीत सदर आत्मदहन स्थगित करण्यात महसूल विभागाला यश प्राप्त झाले तर किनगाव राजा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिवन जायभाये, मिलींद सोनपसारे सचिन परसुवाले, चालक सवडे,महीला पोलिस कर्मचारी सोनल चव्हाण, अनुराधा डुडीयार यांनी सकाळी सहा वाजेपासून खडक पुर्णा नदीपात्रात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख बंदोबस्त तैनात केला होता यावेळी निमगाव वायाळ येथील मोठ्या प्रमाणात नागरीक उपस्थित होते

# खामगावच्या प्रकाश सोनी यांच्या खुनाचं असं आहे शेगाव कनेक्शन पोलिसांनी तिघांना उचलले...

जनसंचलन/ खामगाव

:खामगावच्या प्रकाश सोनी यांच्या खुनाचे आरोपी पोलिसांनी काही तासातच शेगाव येथून गजाआड केले असल्याची माहिती समोर येत आहे. खामगाव शहरात २६ मे रोजी संध्याकाळच्या वादळी वाऱ्याने विद्युत पुरवठा काही वेळासाठी खंडित झाला होता.यांचं संधीचा फायदा घेत त्या चौघांनी प्रकाश सोनी यांचा खून केला आहे. झाले असे की, प्रकाश गोपीनाथ सोनी ५० (रा.रेखा प्लॉट, खामगाव) हे काही दिवसांपूर्वी शेगाव येथील क्लब मध्ये खेळण्यासाठी गेले होते. सोनी यांनी मोठी रक्कमही त्यावेळी जिंकली होती. प्रकाश सोनी यांचे काही पैसे क्लबने बाकी ठेवले होते. पुन्हा चार-पाच दिवसांपूर्वी बाकी पैसे मागण्याकरिता प्रकाश सोनी शेगावला गेले होते. तेव्हाच प्रकाश सोनी यांचा क्लबच्या संबंधित काही लोकांसोबत मध्ये वाद झाला होता. शेगाव येथून काल २६ मे रोजी रात्री विजय सहदेव बढे,विठ्ठल एकनाथ बढे खामगाव शहरात आले होते. वादळामुळे खामगाव शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. विजय सहदेव बढे व विठ्ठल एकनाथ बढे हे रात्री दहा वाजताच्या सुमारास दोन अनोळखी व्यक्ती सोबत प्रकाश सोनी यांच्या खामगाव बस स्थानका समोरील जय माँ पान टपरीवर पोहचले तिथे त्यांनी प्रकाश सोनी यांच्यासोबत वाद घातला यानंतर प्रकाश सोनी यांच्या छातीवर विजय सहदेव बढे यांने दोन्ही हाताने मारून त्यांना मागे लोटले, विठ्ठल बढे याने सोनी यांना मागून पकडून ठेवले होते. दोन अनोळखी व्यक्तीने त्यांचे दोन्ही हात पकडून ठेवले होते.विजय बढे याने त्याच्याजवळाची कुकरी काढून प्रकाश सोनी यांच्या छातीत भोसकून सोनी याना गंभीर जखमी केले होते. नंतर चौघांपैकी दोघे शेगाव रस्त्याने तर दोघे खामगाव बस स्थानकाच्या आवाराच्या दिशेने पडत सुटले होते. गोपाल सोने यांनी मित्राच्या मदतीने प्रकाश सोनी यांना खामगावच्या



सामान्य रुग्णाला दाखल केले मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी करून त्यांना यांना मृत घोषित केले होते. याप्रकरणी गोपाल प्रकाश सोनी यांनी तशी तक्रार २७ मे रोजी खामगाव शहर पोलीस स्टेशनला दिली आहे. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. आतापर्यंत पोलिसांनी विजयी सहदेव बढे, ज्ञानेश्वर तेजराव हिंगणे, विशाल बाबुराव इंगळे यांना अटक केली आहे. पुढील तपास एपआय संदीप गोंडाणे करीत आहेत.

# वादळामुळे गोठ्याला आग दोन म्हशी ठार !

जनसंचलन/ साखरखेर्डा

येथील एका शेतातील गोठ्याला आग लागल्याने दोन म्हशीचा होरपळून मृत्यू झाला असून दोन म्हशी गंभिर जखमी झाल्या बा आहेत. ही घटना २६ मे रोजी सायंकाळी घडली. साखरखेर्डा येथील रवींद्र कुळकर्णी यांच्या मालकीच्या शेतात शेख मस्तान शेख मस्जीद यांचा गोठा आहे त्या गोठ्यात चार म्हशी बांधलेल्या होत्या. २६ मे रोजी सायंकाळी जोरदार वादळी वारा सुटला होता. त्याचवेळी साखरखेर्डा शिवारातील रविंद्र कुळकर्णी यांच्या शेतातील शेख मस्तान यांच्या गोठ्याला आग लागली . या आगीत दोन म्हशीचा होरपळून मृत्यू झाला तर दोन म्हशी गंभिर जखमी झाल्या आहेत. गोठ्यातील कडबा, कुटार, टिनपत्रे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या आगीचा पंचनामा तलाठी संजय शिंगणे यांनी केला असता १ लाख ७० हजारांच्या म्हशी आणि इतर साहित्य १ लाख २५ हजार मिळून २ लाख ९५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

# दुचाकीसह चोरट्याला केली अटक

जनसंचलन/खामगाव

घरासमोरून दुचाकी चोरून नेणाऱ्या दुचाकी चोराला शिवाजीनगर पोलिसांनी दुचाकीसह ताब्यात घेतले. तर यातील एक आरोपी पसार होण्यात यशस्वी झाला. तक्रारीनुसार, प्रसाद मोहन वाघ २० यांनी आपल्या घरासमोर दुचाकी (क्र. एमएच २८ बीएच १५५२) उभी केली होती. ही दुचाकी उभी केलेल्या ठिकाणी आढळून न आल्यामुळे वाघ यांनी शिवाजीनगर पोलिसांत दुचाकी हरविल्याची तक्रार नोंदविली. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करताना शिवाजीनगर पोलिसांनी सोमवारी सायंकाळी स्वप्निल विलास निंबाळकर (२३, रा. घाटपुरी) याला अटक केली. त्याच्या जवळून दुचाकी जप्त केली. तर त्याचा साथीदार अजय शालीग्राम अडणे (२२ वर्ष) हा पसार होण्यात यशस्वी झाला.

# वादळी वाऱ्यामुळे शेतातील सौर ऊर्जा पॅनलचे नुकसान



जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील मौजे मेरा बुद्रुक येथे वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे शेतात लावलेले सौर ऊर्जा पॅनलचे मोठे नुकसान झाल्याची घटना दिनांक २५ मे रोजी सायंकाळच्या चारच्या सुमारास घडली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की मौजे मेरा बुद्रुक येथे २५ मे रोजी सायंकाळी चार वाजेचे सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस बरसल्याने या वादळी वाऱ्यात मौजे मेरा बुद्रुक येथील शेतकरी श्रीमती शोभा अंकुश पैठणी यांच्या मेरा बुद्रुक भाग एक मधील गट नंबर ६३८ शेतातील लावलेले सौर ऊर्जा पॅनलचे (स्पेन) मोठे नुकसान झाले आहे तसेच त्यातील( नउ )ही पॅनलचा फार मोठे नुकसान झाल्याने आता लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळणार का? एकीकडे प्रशासनाने सौर उर्जेवर भर दिला तर शेतकरी त्याला चांगली पसंती देत आहे परंतु जर पहिल्याच वाऱ्या वादळात ते पडत असेल व त्या पडझडीचे नुकसान होत असेल तर शेतकऱ्याने दात मागायची कशी पूर्वीचाच गेल्या तीन ते चार महिन्या वर्षापासूनचा चालू असलेला संघर्ष संपला आणि सौर पॅनल फिट झाले गेल्या दोन महिन्यापूर्वी फिट झालेले पॅनल जर हे पडत असेल तर प्रशासनाने याच्या क्वालिटी गुणवत्तेची तपासणी करून यांना योग्य मार्गदर्शन करण्याची गरज आहे अन्यथा शेतकऱ्यांना जशी विद्युत रोहित्र जळाल्यावर परेशानी होते तोच भाग आता सौर ऊर्जे चाही होईल का असे सर्वसामान्यांच्या मनात पडलेला प्रश्न आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चक्क अभियंत्याला कंत्राटदाराने दिली इनोव्हा कार भेट...

वृत्तसंस्था/अमरावती

अमरावतीमध्ये सध्या अभियंता आणि ठेकेदारांची चांगलीच चलती असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच अमरावती जिल्हा परिषद बांधकाम विभागातील एका अभियंताला एका मोठ्या कंत्राटदाराकडून नवीन कोरी इनोव्हा कार भेट देण्यासाठी अमरावतीमधील शोरुममध्ये इनोव्हा कार बुक केली गेली असल्याचे समोर आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबणीवर गेल्याने सर्वत्र प्रशासक राज सुरू आहे. जिल्हा परिषद देखील याला अपवाद नाही. जिल्हा परिषदेत जरी प्रशासक राज सुरू असले तरी येथे नेहमीच अधिकार्यांचे राज्य असते. मुख्य कार्यकारी अधिकारी या पदापेक्षाही जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता पद फार मोठे असल्याचे मानले जाते. येथे कुठल्याही कामाचे टेंडर मॅनेज केल्यापासून तर अनेक भ्रष्टाचारी कार्य हाती घेतल्या जाते. बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, टेंडर क्लार्क व ठेकेदार यांच्या संगणमताने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार उघड उघड होत असतो. सर्व कायदे, नियम धाब्यावर बसून टेंडर मॅनेज केल्या जातात. कुठल्या ठेकेदाराला ठेका मिळेल हे आधिच फिक्स झालेले असतात. असाच प्रकार धामणगाव येथील एक मोठा ठेकेदार येथे येऊन गब्बर झालेला आहे आणि या ठेकेदाराने अधिकार्यांना आपल्या खिशात ठेवण्यासाठी नवीन नवीन शक्कल लढवली आहे. जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या उघड चर्चा नुसार या अभियंताला खुश करण्यासाठी नवी कोरी इनोव्हा कार भेट देण्यासाठी शहरातील एका बड्या शोरुममध्ये ही गाडी बुक करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे बांधकाम गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूल शाळेच्या मैदानात सुरू आहे. जवळपास ५६ कोटीचा हा ठेका असल्याचे सांगण्यात येते. हा ठेका एका विशिष्ट ठेकेदाराला देण्यासाठी टेंडर मॅनेज करण्यात आले. टेंडरची देणगी मिळाल्यामुळे हा संबंधित ठेकेदार एवढा खुश आहे की त्याने आपल्या साहेबाला खुश करण्यासाठी थेट नवीन कोरी इनोव्हा कार बुक करण्यात आली. ही भेट पूर्णतः निःशुल्क असल्याचे सांगण्यात येत आहे. या नव्या कोर्या इनोव्हाची चावी सोपवण्याआधी आरटीओचे सारे सोपस्कार पार पाडून चाबी देणार



असल्याचे जि.प.तील खास सुत्राने सांगितले आहे. जिल्हा परिषदेत अधिकारी व ठेकेदारांमध्ये यातून एक मोठा संघर्ष होण्याची नांदी स्पष्ट झाली आहे. अभियंता किंवा कुठल्याही जिल्हा परिषदेच्या अधिकार्याला अशा प्रकारची लालूच देऊन ठेकेदाराने आपल्याच पायावर कुर्हाड मारून घेतलेली आहे. कुठलेही टेंडर मॅनेज करण्यासाठी आता भ्रष्टाचाराची रक्कम किंवा कमिशन देण्याची गरज राहिलेली नाही. भेटवस्तू म्हणून अधिकार्यांना अशी मेजवानी देण्याची एक नवीन प्रथाच पडणार आहे. इनोव्हा कार किंवा सोन्याचे दागिने एखादा भूखंड, परदेश वारीची ट्रीप, विदेशातील मौजमजा अशा प्रकारच्या नव्या पॅकेज भ्रष्टाचारामध्ये निर्माण झाल्यास नवल वाटू नये. कामाचे टेंडर मॅनेज करताना ठेकेदाराला एक चांगला पर्याय उपलब्ध झालेला आहे.

# मनुस्मृतीचे समर्थन करणारा शैक्षणिक आराखडा रद्द करा

जनसंचलन/बुलढाणा

मंगळवार, दि.२८ मे २०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी यांना श्रद्धेय अॅड.बाळासाहेब आंबेडकर, प्रा.अंजलीताई आंबेडकर व सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे सल्लागार महेशजी भारतीय सर यांच्या आदेशानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य यांनी मनुस्मृतीचे समर्थन करणारा आराखडा जाहीर केलेला आहे त्याच्या निषेधार्थ सम्यक विद्यार्थी आंदोलन बुलढाणा जिल्हाध्यक्ष मोहित दामोदर यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. मनुस्मृती ही माणसा माणसांमध्ये भेद निर्माण करणारी आहे आणि जर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य यांनी मनुस्मृतीचे समर्थन करणारा शैक्षणिक आराखडा अभ्यासक्रमाध्ये समाविष्ट केला तर इथं नव्याने मनुस्मृती आणण्याचं काम या छत्रपती शिवाजी महाराज - फुले - शाहू - आंबेडकरांच्या महाराष्ट्रात जाणिवपूर्वक होताना दिसत आहे आणि विद्यार्थ्यांना भेदभाव करण्यासाठी शिकवन देण्याचं काम करण्याच कटृ आहे.

मनुस्मृतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक नाकारला आणि याचा बदला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी



२५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन केले आणि समता, न्याय, बंधुता या तत्वांचा आधारावरील संविधान रा देशाला बहाल केले, आता ही नवं मनुस्मृती नव्यानं आणण्याचा प्रयत्न होत आहे पन वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन हे नवं मनुस्मृती आणण्याचं डाव हाणुन पाडणार व जर शैक्षणिक आराखड्यामध्ये मनुस्मृतीचे समर्थन करणारा अभ्यासक्रम रद्द नाही करण्यात आला तर संपूर्ण महाराष्ट्रात व जिल्हाभरात तिव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष मोहित दामोदर यांनी दिली आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडी बुलढाणा शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे, सम्यकचे जि.निरिक्षक प्रफुल्ल वानखडे, राज वानखडे, गिरीश उमाळे, विशाल चोपडे, विजय राऊत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोताळावासि ठरणार ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार..

जनसंचलन/बुलढाणा

मोताळ्यात पार पडणारी विधवा परिषद ऐतिहासिक ठरण्याची चिन्हे आहेत. या परिषदेची जययत तयारी मानस फाउंडेशन व शिवसाई परिवाराने केली आहे. यासाठी आयोजक प्रा डी एस लहाने रणरणत्या उन्हात पायाला भिंगरी लावून बैठका व आवश्यक ते नियोजन करीत आहे. मोताळा तालुक्यातील ४१ गावांना त्यांनी भेटी देऊन विधवांशी संवाद साधला. यावेळी प्रत्येक गावातील विधवांनी आम्ही परिषदेला जायचं ठरवलंय.. असा आशावादी विश्वास दिल्याने ३० मे रोजी होणारी विधवा परिषद समाज बदलाकडे पाऊल टाकणारी असल्याने ऐतिहासिक ठरण्याची चिन्हे आहे.

एखाद्या विषयाला वाहून घेणे कशाला म्हणतात ते सध्या प्राध्यापक डी एस लहाने यांच्या कार्यातून दिसून येत आहे. एकीकडे लग्नाची धूम, असह्य होणारा उकाडा आणि या तळपत्या उन्हात पायाला भिंगरी लावून मोताळा तालुक्यातील पाच-पन्नास गावात भटकंती करण्याचे काम डी



एस लहाने करीत आहे.प्रत्येक गावात जाऊन विधवा महिलांशी संवाद साधने, तुमच्यासाठीच मेळावा आहे, तुम्ही या.. मेळाव्यात सहभागी व्हा असे आवाहन करीत आहे. त्यांचं होणार छोटेखानी भाषण आणि त्या भाषणादरम्यान अनेक विधवांच्या डोळ्यातुन वाहणाऱ्या अश्रूंच्या धारा खूप काही सांगून जातात. बेंबीच्या देठापासून आलेली भावना ही वरवर पोपटपंची पेक्षा आश्वासक ठरते. हेच प्राध्यापक लहाने यांनी सध्या दाखवून दिले आहे. त्यांचे निरागस प्रयत्न विधवा महिलांना भावत असून लहाने यांच्या रूपाने त्यांना मोठा भाऊ मिळाला आहे.

# आरबीआयची येस बँक आणि आयसीआयसीआय बँकेवर कारवाई...

वृत्तसंस्था/नव्वी दिल्ली

रिझर्व्ह बँकेने खासगी क्षेत्रातील दोन बड्या बँकांवर कारवाईचा बडगा उघारला आहे. त्यानुसार आरबीआयने येस बँक आणि आयसीआयसीआय बँकेवर कारवाई केली आहे. या मोठ्या बँकांवर कारवाई केल्यानंतर त्यांना कोट्यवधींचा दंड ठोठावला आहे. झव्र्ह बँकेने खासगी क्षेत्रातील दोन बड्या बँकांवर कारवाईचा बडगा उघारला आहे. त्यानुसार आरबीआयने येस बँक आणि आयसीआयसीआय बँकेवर कारवाई केली आहे. या मोठ्या बँकांवर कारवाई केल्यानंतर त्यांना कोट्यवधींचा दंड ठोठावला आहे. येस बँक आणि आयसीआयसीआय बँक अनेक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नसल्याने आरबीआयने() सांगितले. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, येस बँकेवर ग्राहकांच्या सेवा तसेच कार्यालयीन खात्यांशी निगडित मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा आर-




ोप आहे. गेल्या अनेक काळात आरबीआयसमोर अशी अनेक प्रकरणे आली,ज्याक बँकेने अपुऱ्या शिलकीमुळे ग्राहकांच्या खात्यांमधून शुल्क वसूल केले शिवाय कार्यालयीन खात्यांमधून बेकायदेशीर कामे केली जात होती.आरबीआयने केलेल्या मूल्यांकनात असे समजून आले की, येस (-)बँकेने गेल्या २०२२ या वर्षात अनेकदा नियमांचे उल्लंघन केले. या बँकेने आपल्या अनेक ग्राहकांच्या नावाने काही अंतर्गत खाती उघडली असून ती चालवण्यातही आली होती. त्यामुळे बँकेला तब्बल ९१ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे आयसीआयसीआय बँक आणि ऍडव्हान्सशी संबंधित अनेक निर्देशांचे उल्लंघन केल्याने दोषी आढळली. त्यासाठी बँकेला तब्बल एक कोटी रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. बँकेने पूर्ण तपास न करता अनेक कर्ज मंजूर केले ,त्याचमुळे आर्थिक धोक्याचा सामना करावा लागला.